महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-०३१८/प्र.क्र.१२८/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक २९ मे २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील, प्रतीक्षा नगर, सायन, येथील म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या आठ इमारतींच्या दुरूस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/ कक्ष-८(४)/ शा.२६१/ २०१७, दिनांक २३.०८.२०१७.

४) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/ कक्ष-८(४)/ शा.५६/ २०१८, दिनांक ०५.०३.२०१८.

५) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/ कक्ष-८(४)/ शा.३९/ १९, दिनांक २५.०१.२०१९.

ज्ञापन.

प्रतीक्षा नगर, सायन, मुंबई, येथील म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या आठ इमारतींमधील ३०० सदनिका ह्या सेवा निवासस्थाने म्हणून वापरण्यासाठी सन २०१३ मध्ये पोलीस विभागासाठी खरेदी करण्यात आल्या होत्या. या इमारतींच्या दुरूस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी उप विभागीय अभियंता, उत्तर (सा.बां.) उप विभाग, दादर, मुंबई, यांनी सन २०१७-१८ च्या राज्य ई-दरसूचीनुसार तयार केलेले एकूण रु.१,७८,१८,४८०/- इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले असून ते कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते पुढील तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारित केले आहेत आणि, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास सहमती दिली आहे:-

अ.क्र (१)	कामाचे नाव (२)	खर्चाचे अंदाज (३)
१.	*“MOW to Renovation of Toilet Block at Pratiksha Nagar, Sion Police Colony, Buildings L-9A, 9B, 9C, 9D and 9E, and Building L-5A and L-10B.”*	रु.३५,४१,२१६/-
२.	*“MOW to Replaster and Painting at Pratiksha Nagar, Sion Police Colony, Building L-5A and L-5B.”*	रु.२२,२८,९९८/-
३.	*“MOW to Replaster and Painting at Pratiksha Nagar, Sion Police Colony, Buildings L-9A, 9C, 9D, 9E and 10B.”*	रु.३१,१६,६७१/-
४.	*“MOW to Providing External Rain Cost and Acrylic Paint to External Wall at Pratiksha Nagar, Sion Police Colony, Buildings L-9A to L-9E.”*	रु.४६,७३,६३३/-
५.	*“MOW to Providing External Rain Cost and Acrylic Paint to External Wall at Pratiksha Nagar, Sion Police Colony, Buildings L-5A to L- 9B.”*	रु.२२,१९,७१७/-
एकूण-		रु.१,५७,८०,२३५/

४. त्या अनुसार, प्रतीक्षा नगर, सायन, मुंबई, येथील म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या आठ इमारतींच्या दुरूस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी एकूण रु.१,५७,८०,२३५/- *(रुपये एक कोटी सत्तावन्न लक्ष, ऐंशी हजार दोनशे पस्तीस फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू नये;

२) खर्चाचे अंदाज हे पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई, यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, ००, १०८, राज्य मुख्यालय पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत)(अनिवार्य) (२०५५ ००९७), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१५६/२०१९/इमा.-२, दिनांक ०२.०४.२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०५२९१६००१७४०२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627,
postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79
e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.05.29 16:04:56 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारलेल्या "Abstract" च्या प्रतीसह).*
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).